पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 20/02/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर वायगाव घोटुर्ली येथे दिनांक 19/02/2020 चे 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनोज साहासराम सिंह, वय 48 वर्ष, रा. वायगाव घोटुर्ली उमरेड हे त्यांच्या युनियनच्या सदस्यासोबत युनियन ऑफिसमध्ये चर्चा करीत असतांना आरोपी नामे– क्र. 1) जावेद पटेल, 2) वासिम पटेल, 3) शाहबाज पटेल, 4) मक्कु पटेल, 5) संदीप उर्फ डेन्जु समुद्रे व ईतर 5 आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमा करून फिर्यादींच्या ऑफिसमध्ये आले. यानंतर आरोपीतांनी म्हटले की, ''मनोज सिंह कोन है'' यावरून फिर्यादीने म्हटले मी आहो. यानंतर आरोपीतांनी हातबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादिचे ऑफिसचे दोन खुर्च्या तोड फोड करून फिर्यादिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 141, 143, 147, 149, 294, 506, 323 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. डोरलेकर हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कुही :– दि. 19/02/2020 चे 19:30 वा. चे सुमारास 22 वर्षीय पीडित/फिर्यादी ही घरासमोर नळावर पाणी भरत असतांना आरोपी नामे– गणेश निलकंठ वंजारी, वय 27 वर्ष, रा. भुगाव व त्याचे दोन मित्र मिळुन पीडितेला तुझी बहीण कुठे आहे, असे म्हणुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीतांनी पीडितेच्या वडीलांना शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ) (1), 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कवडु चौधरी 9226928822 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर